# 'बीकेसी'त सर्वाधिक लांबीचे मेट्रो स्थानक

## ४७४ मीटर लांब आणि ३२.५ मीटर रुंद, अतिरिक्त फलाटही असणार

**मुंबई :पुढारी वृत्तसेवा**

कुलाबा-वांद्रे-सिप्झ मेट्रो-३मार्गातील बीकेसी हे आतापर्यंतच्या मेट्रो मार्गातील सर्वाधिक लांबीचे स्थानक ठरणार आहे. हे स्थानक तब्बल ४७४ मीटर लांब आणि ३२.५ मीटर रुंदीचे असेल.

त्याचबरोबर या स्थानकावरून सर्वाधिक प्रवासी प्रवास करतील,त्यामुळे हे स्थानक गर्दीचे असेल,असा अंदाज आहे.या स्थानकाला मेट्रो-२-ब मार्ग इंटरचेंज स्वरूपात असेल.

बीकेसी स्थानक हे मेट्रो ३ मार्गावरील मध्यवर्ती स्थानक असेल.या मार्गावरील काही फेऱ्या कुलाबा ते बीकेसी आणि बीकेसी ते कुलाबा अशाही असतील.त्यासाठी स्थानकावर अतिरिक्त फलाट असतील.

या स्थानकापर्यंत जाणारा बोगदा हा मिठी नदी खालून ९.५७ मीटर खोलीवर आहे.बीकेसी ते धारावी असा हा बोगदा आहे.हे स्थानकही 'कट अँड



कव्हर'या धर्तीवर बांधले जात आहे.स्थानक बांधण्यासाठी जे खोदकाम करण्यात आले आहे,ते खोदकाम स्थानक पूर्ण झाल्यानंतर बुजवण्यात येईल.जमिनीचा पृष्ठभाग पूर्ववत केला जाईल.

स्थानकात प्रवेश करण्यासाठी सहा प्रवेशद्वारे असतील,तर प्रवाशांच्या सोयीसाठी स्थानकाच्या आत ३० सरकते जिने असतील.

मेट्रो-३ हा मार्ग पूर्णपणे भूमिगत असल्याने वायुवीजनाची खास व्यवस्था सर्वच स्थानकांच्या आत करण्यात आली आहे.स्थानकातील धूळ बाहेर फेकण्यासाठी विशिष्ट यंत्रणा बसवली जात आहे.मुंबईचे वातावरण आणि हवामान लक्षात घेता आर्द्रता,स्थानकातील तापमान नियंत्रित राखण्याची विशेष यंत्रणा आहे.स्थानकात शुद्ध हवा खेळती राहण्यासाठीही खास उपाययोजना करण्यात आली आहे.

आरे कारडेपोच्या वादामुळे हा प्रकल्प मार्ग रखडला होता.कारडेपोसाठी आरेच्या जागेवर शिक्कामोर्तब झाल्याने प्रकल्प वेगाने पूर्ण करण्यावर भर दिला जात आहे.मात्र कुलाबा ते सिप्झ हा पूर्ण मार्ग कार्यान्वित होण्यास वेळ लागणार असल्याने मेट्रो-३ मार्ग दोन टप्प्यांत सुरू होईल.पहिला टप्पा कुलाबा ते बीकेसी असा असेल. काम पूर्ण झाल्यानंतर या टप्प्यात मेट्रो धावेल.